| | |
|---|---|
| प्राप्त तारीख | २४.१०.२०१९ |
| नोंदणी तारीख | २४.१०.२०१९ |
| निकाल तारीख | ०७.०५.२०२६ |
| कालावधी | **०६ वर्षे ०६ महिने १३ दिवस** |

**भाग अ***

**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र.४४(१)]**

| | | |
|---|---|---|
| | | **निशाणी क्र.-३२/ब** |
| **सिरोंचा येथील प्रथमवर्ग न्यादंडाधिकारी, सिरोंचा, यांच्या न्यायालयात,**<br>पिठासिन अधिकारी : उन्मेश बा. श्रीराम | | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र.**२१/२०१९**, **सिरोंचा** पोलीस ठाणे | |
| न्यायनिर्णयाची तारीख | **०७.०५.२०२६** | |
| प्रकरण क्रमांक | **नियमित फौजदारी खटला क्रमांक ४६/२०१९** | |
| | **CNR- MHGA08-000332-2019** | |
| तक्रारकर्ता/अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत/द्वारा पोलीस ठाणे अधिकारी, सिरोंचा पोलीस ठाणे<br>(फिर्यादी- राहुल व्यंकटेश्वर मारगोनी) | |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्री. कृष्णा व्ही. तोकलवार,**<br>(सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता) | |
| आरोपी | | **मनोज उर्फ गिरी सत्यनारायण कोंड्रा,**<br>वय- ३२ वर्षे, व्यवसाय- मजुरी,<br>राहणार-सिरोंचा छोटा बाजार,<br>तालुका-सिरोंचा, जिल्हा - गडचिरोली. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | | **श्री. फिरोज के. खान,**<br>(बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

## भाग ब*

## [फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र.४४(२)]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २०.०२.२०१९ ते २१.०२.२०१९ |
| पहिल्या खबरीची तारीख | ०३.०३.२०१९ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | २३.१०.२०१९ |
| दोषारोपनिश्चितीची तारीख | २८.०१.२०२० |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | ०५.०१.२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | ०७.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०७.०५.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | - |

## आरोपीबाबत तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनवर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिध्द की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मनोज उर्फ गिरी सत्यनारायण कोंड्रा | १८ सप्टेंबर २०१९ | २० सप्टेंबर २०१९ | भारतीय दंड विधान १८६० च्या कलम ३७९ नुसार | **निर्दोष** | - | - |

**भाग क**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र.४४(३)]**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोग पक्षः**

| **क्रमांक** | **नांव** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|
| सा.क्र.१ | स्वामी मलया बद्दी **(निशाणी क्र.१५)** | पंच साक्षीदार |
| सा.क्र.२ | राहुल व्यंकटेश्वर मारगोनी **(निशाणी क्र.२३)** | फिर्यादी |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबध्द दस्तांची यादी**

**अ. अभियोग पक्षः**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | निशाणी **पी–१६/**सा.क्र.१ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | निशाणी **पी–१७/**सा.क्र.१ | गुन्ह्याचा तपशील नमुना |
| ३. | निशाणी **पी–१८/**सा.क्र.१ | मालमत्ता शोध व जप्ती पंचनामा |
| ४. | निशाणी **पी–२४/**सा.क्र.२ | फिर्याद |
| ५. | निशाणी **पी–२५/**सा.क्र.२ | छापील एफ.आय.आर. |

**ड. महत्वाच्या वस्तुः**

| **अ.क्र.** | **महत्वाची वस्तु क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| – | – | – |

| **या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील** | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | **फौजदारी संहिता** |
| भारतीय दंड विधान, १८६० | **दंड विधान** |
| भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ | **पुरावा अधिनियम** |

# न्यायनिर्णय

[आज दिनांक **०७ मे, २०२६** रोजी उद्घोषित]

प्रस्तुत प्रकरणात आरोपीवर त्याने फिर्यादी यांची दुचाकी चोरुन नेल्याचा आरोप आहे. आरोपीने सदर आरोप नाकारला व दोषसिध्दतेचे आव्हान अभियोग पक्षाला मिळाले. प्रस्तुत प्रकरण निकाली काढणेकामी सहा वर्षाहून अधिक कालावधी लागला.

**पोलीस अहवालातील समोर येणारे तथ्यः-**

2. दिनांक २०.०२.२०१९ रोजीचे रात्री ११.०० वाजता फिर्यादी यांनी त्यांची एच.एफ.डिलक्स कंपनीची निळ्या काळ्या रंगाची दुचाकी क्र.एम.एच. -३३-०६४९ त्यांच्या घरासमोरील दुकानाच्या समोरील खुल्या शेडमध्ये लॉक लावुन ठेवली होती. दिनांक २१.०२.२०१९ रोजीचे सकाळी ०७.०० वाजताचे दरम्यान फिर्यादी यांनी त्यांची दुचाकी गाडी सदर शेडमध्ये पाहिली असता, ती त्यांना मिळुन आली नाही. त्यानंतर फिर्यादीने त्यांच्या दुचाकीचा परिसरात शोध घेतला. परंतु तरी देखील त्यांना ती मिळुन आली नाही. त्यावेळी त्यांना त्यांची गाडी अज्ञात इसमाने चोरुन नेल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर फिर्यादीने अज्ञात आरोपीविरुध्द सिरोंचा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २१/२०१९ दाखल केला.

3. संबंधित गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार, नामे काशिनाथ कुंडगीर यांच्याकडे सोपविण्यात आला. श्री. कुंडगीर यांनी तपासाअंती आपला अंतिम अहवाल फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १७३ प्रमाणे न्यायालयात दाखल केला. तपासा दरम्यान त्यांनी आरोपीस अटक केली व प्रस्तुत अहवाला सोबत त्यांनी मुळ खबर, घटनास्थळ पंचनामा, कागदपत्रे व साक्षीदारांचे जाबजबाब हे दस्त तयार केले. त्यांच्या तपासातील निष्कर्षानुसार आरोपीने सदर दुचाकीची चोरी

केल्याचे निष्पन्न झाले व त्याबाबत पुरेसा पुरावा मिळाल्याने त्यांनी अंतिम अहवाल सादर केला.

**गुन्ह्याची दखल, आरोपीचे प्रतिकथन व बचावः-**

4. आरोपीकडून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २३९ प्रमाणे दोषमुक्त करण्याचा अर्ज सादर करण्यात आला नाही अगर तशी परिस्थिती या प्रकरणात नव्हती. सबब फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४० नुसार माझे पुर्व सुविद्य पिठासिन अधिकारी यांनी दिनांक २८.०१.२०२० रोजी आरोपी विरोधात नि.क्र.१३ खाली दोषारोप निश्चित केला. सदर दोषारोपातील मजकुर आरोपीला वाचुन व समजावुन सांगितला असता त्याने गुन्हा कबुल न करता संपरिक्षेला सामोरे जाण्याचा मार्ग निवडला, हे अभिलेखी असलेल्या त्यांच्या नि.क्र. १४ च्या प्रतिकथनावरुन दिसून येते. त्यानंतर अभियोग पक्षाचा पुरावा नोंदविण्यात आला. तो पुरावा या न्यायनिर्णयाच्या परिशिष्टात नमुद केला आहे. त्यानंतर सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. कृष्णा व्ही. तोकलवार यांनी वरील प्रकरणात यापुढे कोणतेही साक्षीदार तपासावयाचे नसल्याबाबत नि.क्र.२९ वर पुरसीस दाखल केली. त्यानुसार अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

5. अभियोग पक्षाचा पुरावा बंद झाल्यानंतर, आरोपीचे स्पष्टीकरणात्मक निवदेन (निशाणी क्र.३०) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३(१)(ब) अन्वये नोंदविण्यात आले. त्यात आरोपीने पुर्णपणे निर्दोष असल्याचा बचाव घेतला. हे नमुद करणे आवश्यक आहे की, आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३(५) नुसार अतिरीक्त लेखी बयाण सादर केले नाही.

**युक्तीवादः-**

6. त्यानंतर मी अभियोग पक्षातर्फे पुर्व सुविद्य सहायक सरकारी अभियोक्ता श्री. कृष्णा व्ही. तोकलवार आणि आरोपीतर्फे सुविद्य विधीज्ञ श्री.

फिरोज के. खान यांचा युक्तीवाद ऐकला. श्री. तोकलवार यांनी चोरी गेलेली दुचाकी ही फिर्यादीच्या ताब्यातुन मिळुन आल्याचे कथन केले. त्याआधारे आरोपीचा गुन्हा सिध्द होतो असे मुद्दे मांडले. याउलट आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. खान यांनी कथन केले की, प्रस्तुत प्रकरणात आरोपी हा घटनास्थळावरुन पकडला गेला नाही. तसेच कुठलाही साक्षीदार हा ठामपणे आरोपी याने चोरी केल्याचे कथन करीत नाहीत. प्रस्तुत प्रकरणात आरोपीचा सहभागात संशय निर्माण होत असून, त्याचा फायदा आरोपीला मिळत आहे. त्यामुळे आरोपीला निर्दोष मुक्त करावे अशी त्यांनी विनंती केली.

**विचाराधीन प्रश्नः–**

7. या संपूर्ण पार्श्वभूमीवर, अभियोग पक्षाने आरोपीविरोधातील गुन्हा सिध्द करणारा पुरावा सादर केला आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी ह्या न्यायालयाने यापुढे नमूद प्रश्नांबाबत निर्णय नोंदविणे गरजेचे होते. न्यायालयासमोरील प्रकरण, त्यातील तथ्ये व परिस्थिती पाहता आणि उपलब्ध पुराव्याचे सुयोग्य परिनिरीक्षण केल्यावर आज न्यायालयाने सदर प्रश्नांना निर्णय नोंदविले आहेत. ते त्या त्या प्रश्नासमोर मांडले आहेत. या निर्णयांमागची कारणमीमांसा न्यायनिर्णयाच्या उत्तरार्धात शब्दबध्द केली आहे. ते विचाराधीन प्रश्न त्याबाबतचे निर्णय आणि कारणमीमांसा येणेप्रमाणे–

| अ.क्र. | विचाराधीन प्रश्न | निर्णय |
|---|---|---|
| १ | दि.२०.०२.२०१९ रोजीचे सकाळी ११.०० ते ०७.०० वाजेच्या दरम्यान मौजा सिरोंचा, तह. सिरोंचा, जि. गडचिरोली येथे आरोपीने फिर्यादीच्या ताब्यातील मोटारसायकल क्र.एम.एच.–३३–आर–०६४९ चोरुन नेली व त्याद्वारे भारतीय दंड विधानाच्या **कलम ३७९** प्रमाणे दंडनिय अपराध केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | ...नाही... |
| २ | काय आदेश पारीत करता येईल? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमीमांसा

### विचाराधीन प्रश्न क्रमांक १ च्या अनुषंगाने :-

8. दोषारोपातील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाला या खटल्यातील अभिकथित तथ्यांनुसार हे सिध्द करणे आवश्यक होते की,

अ. आरोपीने वाईट हेतूने मोटारसायकल चोरी केली.

ब. सदर मोटारसायकल ही फिर्यादीच्या मालकीची होती.

क. सदर मोटारसायकल ही आरोपीने फिर्यादीच्या विना परवानगी त्याच्या ताब्यातून काढून नेली व त्याद्वारे आपला स्वत:चा फायदा करुन घेण्याचा प्रयत्न केला.

9. नेहमी तपासाअंती असा निष्कर्ष मांडला जातो की, अहवालात नमूद गुन्हे संबंधित आरोपीने केले असावेत असा पुरावा मिळाला आहे. परंतु, संपरिक्षेअंती, उपलब्ध पुराव्यावरुन विचारात घेतलेले गुन्हे आरोपीने केलेच आहेत हे सिध्द होत आहे ही मजल अभियोग पक्षाला गाठावी लागते. म्हणजेच **'आरोपीने गुन्हे केले असावेत'** पासुन **'आरोपीने गुन्हे केल्याचे सिध्द होते'** इथपर्यंतचा प्रवास अभियोग पक्षाला आपल्या सादर केलेल्या पुराव्याआधारे करावा लागतो. अर्थातच, पुरावा कायद्याच्या कलम ०३ प्रमाणे असलेल्या 'शाबीती' च्या व्याख्येनुसार एखादे तथ्य अस्तित्वात आहे असा न्यायालयाचा समज होतो किंवा सर्वसामान्य बुध्दिमत्ता असलेल्या मानवाने ते तथ्य अस्तित्वात आहे अशा समजुतीने विशिष्ट परिस्थीतीत वागायला हवे इतके त्या तथ्याचे अस्तित्व न्यायालयाला संभवनीय वाटते, तेव्हा ते तथ्य शाबित झाले असे म्हणता येते. म्हणजेच अभियोग पक्षाचा आरोप ज्या तथ्यांवर अवलंबून आहे ते तथ्य व त्याचे अस्तित्व अभियोग पक्षाने सिध्द करणे गरजेचे असते.

10. त्याचप्रमाणे अभियोग पक्षाची ही आद्य जबाबदारी असते की, त्यांनी हे गुन्हादर्शक तथ्य प्रस्थापित करणारा पुरावा सादर करावा. ही जबाबदारी पार पाडतांना, सादर केलेल्या पुराव्यातुन अगर पुराव्याभोवती कोणताही वाजवी संशय निर्माण होउ नये, ही काळजी अभियोग पक्षाला घ्यावी लागते. कारण असा वाजवी संशय निर्माण झाल्यास त्यामुळे तथ्य सिध्दतेचा अपेक्षित स्तर साधला जात नाही आणि त्यामुळे अभियोग पक्ष अयशस्वी ठरल्याचा निष्कर्ष मांडणे न्यायोचित ठरते. म्हणुनच, अभियोग पक्षाला आपल्या पुराव्याच्या सादरीकरणादरम्यान सजगता आणि दक्षता बाळगावी लागते. कोण साक्षीदार काय कथन करीत आहे, कोणत्या दस्तातुन कोणते तथ्य प्रस्थापित होत आहे आणि कोणता वाजवी संशय निर्माण होत आहे कां, याकडे अभियोग पक्षाला अत्यंत बारकाईने लक्ष द्यावे लागते.

11. अभियोग पक्षाने केलेले आरोपी सिध्द करण्याची संपुर्ण जबाबदारी त्यांची असते. सदर आरोपी सिध्द करताना अभियोग पक्षाने प्रकरणातील गुन्ह्याचे आवश्यक घटक प्रस्थापित करणारे तथ्य पुराव्यातून सिध्द करणे गरजेचे असते. अशा पुराव्याची सांगड घालताना त्यातून कोणताही संशय निर्माण होणार नाही याची काळजी घेण्याची जबाबदारी देखील अभियोग पक्षाची असते. प्रकरणात जर निर्माण होणारा संशय वाजवी असेल तर तो निश्चितच बचाव पक्षाला उपयोगी ठरतो. त्यामुळे उपलब्ध पुराव्याचे बारकाईने परिनिरीक्षण होणे अत्यावश्यक आहे.

12. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने केवळ दोन साक्षीदार तपासले. त्यापैकी साक्षीदार क्र.१ हा प्रस्तुत प्रकरणातील पंच साक्षीदार असुन, त्याने त्याच्या सरतपासात पोलीसांनी त्यास पंचनाम्या करीता फिर्यादीच्या घरी बोलावल्याचे कथन केले. सदर साक्षीदाराने दिनांक ०४/०३/२०१९ रोजीचा घ टनास्थळ पंचनामा, गुन्ह्याचा तपशील नमुना, मालमत्ता शोध व जप्ती पंचनामा नि.क्र.१६ ते १८ खाली सिध्द केला.

13. बचाव पक्षामार्फत सदर पंच साक्षीदाराचा उलट तपास घेण्यात आला. त्यात त्याने ठळकपणे मान्य केले की, त्यास घटनास्थळ पंचनामा गुन्ह्याचा तपशील नमुना व मालमत्ता शोध व जप्तीचा पंचनामा काय असतो याबाबत माहिती नाही. तसेच नि.क्र.१६ ते १८ खालील पंचनामे किती तारखेला बनवले हे त्यास माहित नाही. सदर साक्षीदाराने हे ठळकपणे मान्य केले की, पंचनामे तयार करीत असताना तो विटभट्टीवर काम करत होता व पोलीसांनी त्याला बोलवुन केवळ तयार पंचनाम्यावर सही करायला सांगितली व त्यानुसार त्याने सही केली. सदर पंचनाम्यातील मजकुर त्याला माहित नाही. सदर साक्षीदारास गुन्ह्यामध्ये चोरी गेलेल्या गाडीचा क्रमांक देखील माहित नसल्याचे त्याने मान्य केले आहे.

14. त्यानंतर अभियोग पक्षाने साक्षीदार क्र.२ म्हणुन फिर्यादी नामे राहुल व्यंकटेश्वर मारगोनी यास नि.क्र.२३ खाली तपासले. त्याने त्याच्या सरतपासात कथन केले की, २०१९ साली रात्री त्याने त्याची दुचाकी क्र.एम.एच.-३३-आर.-०६४९ घराबाहेर पार्क केली होती. सकाळी त्यास त्याची गाडी दिसुन आली नाही. त्याने शोध घेतला असता, त्यास ती मिळुन आली नाही. त्यामुळे, त्याने अज्ञात इसमाविरुध्द फिर्याद दाखल केली होती. सदर फिर्याद त्याने नि.क्र. २४ व २५ खाली सिध्द केली. त्याने सरतपासात पुढे कथन केले की, एके दिवशी तो तुमनुर गावावरुन सिरोंचा येथे आला असता, त्यास बसस्टॅण्ड जवळ त्याची गाडी दिसली. ते पाहुन त्याने पोलीसांना फोन केला. पोलीस तेथे आले. तपासानंतर गाडी त्याची असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलीसांनी त्यास गाडी सुप्रतनाम्यावर परत केली. त्याची गाडी कोणी चोरली होती, याविषयी त्याला काही समजले नाही.

15. फिर्यादीने त्याच्या सरतपासात त्याची मोटारसायकल आरोपीच्या ताब्यातुन मिळुन आल्याबाबत कुठलेही कथन केले नाही. त्यामुळे, अभियोग

पक्षामार्फत त्याचा उलट तपास घेण्यात आला. परंतु, त्यात देखील त्याने मोटारसायकल आरोपीच्या ताब्यातुन मिळुन आल्याचे ठळकपणे नाकारले.

16. प्रस्तुत प्रकरणात दोन साक्षीदार तपासण्यात आले असुन, दोन्ही साक्षीदार हे अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याचे दिसुन येते. प्रकरणात सिध्द झालेली फिर्याद ही अज्ञात इसमाविरुध्द दाखल झाल्याचे दिसुन येते व पुराव्या दरम्यान अभियोग पक्षाने चोरी गेलेली दुचाकी ही आरोपीच्या ताब्यातुन जप्त झाल्याचे किंवा आरोपीने सदर दुचाकी चोरुन नेल्याचे सिध्द केले नाही. त्यामुळे, प्रस्तुत प्रकरणात आरोपीचा ठळक सहभाग दिसुन येत नाही.

17. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षास पुरेसा वेळ देवुन देखील अभियोग पक्षाने इतर साक्षीदार तपासले नाहीत. त्यामुळे, अभियोग पक्षाचे आरोपीविरुध्दचे चोरीचे कथन प्रकरणात सिध्द झाले नाही. वर नमुद चर्चेअंती फिर्यादीची दुचाकी चोरी प्रकरणात आरोपीचा कुठलाही ठळक सहभाग दिसुन येत नसल्याने, आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होत नाही. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देतो व मुद्दा क्र.२ च्या उत्तराखातर खालील आदेश पारीत करीत आहे.

:::: **आ दे श** ::::

1. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २४८(१) नुसार आरोपी मनोज उर्फ गिरी सत्यनारायण कोंड्रा यांना भारतीय दंड विधान, १८६० च्या कलम ३७९ नुसार दंडनिय गुन्हे केल्याचे सिध्द न झाल्याने त्यांना या गुन्ह्यांतुन **निर्दोष** मुक्त करण्यात येत आहे.

2. आरोपीचे अस्तित्वांत असलेले सर्व मुचलके, बंधपत्रे आणि जामीन कदबे रद्द करण्यात येत आहेत. मात्र, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४३७(अ) नुसार आरोपीने नव्याने रुपये २५,०००/- चा वैयक्तिक मुचलका देउन मा. अपिलीय न्यायालयासमोरील त्याची हजेरी सुनिश्चित करावी. हा मुचलका पुढील सहा महिन्यांसाठी वैध राहील.

3. प्रस्तुत प्रकरणात चोरी झालेली फिर्यादीच्या मालकीची दुचाकी क्र.एम.एच. -३३-आर.-०६४९ फिर्यादीस दि.२०/०७/२०१९ रोजीच्या कि.फौ.मा.क्र. ४९/२०१९ मधील आदेशान्वये यापुर्वीच सुप्रतनाम्यावर देण्यात आली आहे. तिचा ताबा फिर्यादीकडे कायम करण्यात येतो.

4. माननीय मुंबई उच्च न्यायालयाने **रंजना शांतीलाल सुर्यवंशी वि. जयप्रकाश तुळशीराम गुप्ता** या प्रकरणात दिलेल्या निर्णयातील मार्गदर्शक तत्वांना अनुसरुन, या न्यायनिर्णयाची एक सत्यप्रत मा. जिल्हा दंडाधिकारी, गडचिरोली यांच्याकडे पाठविण्यात यावी.

*सदरील स्वहस्ते मुद्रित केलेला न्यायनिर्णय आज दि.०७.०५.२०२६ रोजी, आरोपीच्या उपस्थितीत ११.४५ वाजता उद्घोषित केला.*

Digitally signed by UNMESH BALU SHRIRAM
Date: 2026.05.07 19:58:10 +0530

**(उन्मेश बा. श्रीराम)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सिरोंचा
(न्यायिक अधिकारी संकेतांक क्रमांक-MH03286).

**प्रमाणपत्र**

मी शपथेवर सांगतो की, पी.डी.एफ. न्यायनिर्णयामधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराप्रमाणे शब्द-न-शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव : विठ्ठल विश्वांभर मिठ्ठेवाड
लघुलेखक (श्रेणी-३)

न्यायालयाचे नाव : दिवाणी व फौजदारी न्यायालय,
सिरोंचा.

न्यायनिर्णयाची तारीख : ०७/०५/२०२६.

मा.पिठासीन अधिकारी यांनी न्यायनिर्ण-
यावर सही केल्याची तारीख : ०७/०५/२०२६.

न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख: ०७/०५/२०२६.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by
VITHAL
VISHWAMBHAR
MITHEWAD
Date: 2026.05.07
20:03:32 +0530

(विठ्ठल विश्वांभर मिठ्ठेवाड)
लघुलेखक (श्रेणी-३)
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
सिरोंचा.